दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.११ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 11 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 26 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.


# बीडसाठी विशेष निधी अन् मंजूरी द्या

## खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांची भेट घेवून केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा दुष्काळग्रस्त आहे. पायाभूत सोयी-सुविधा पण कमी आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष निधी आणि मंजुरी मिळावी, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय ऊर्जा आणि गृहनिर्माण तथा शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दि.१० रोजी खा.सोनवणे यांनी मुंबई येथे मंत्री खट्टर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

बीड जिल्ह्यात विविध विकास योजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांना दिलल्या निवेदनात म्हटले आहे, ग्रामीण भागात नवी वीज सबस्टेशन, ट्रान्सफॉर्मर गावागावात स्थिर वीजपुरवठा व्हावा म्हणून ही गरज आहे. शेतकऱ्यांना सौर पंप (पीएम-कुसुम योजना) शेतीसाठी पाणीपुरवठा सोपा होईल. शहरी भागात स्मार्ट मीटर व भूमिगत केबल वीज चोरी थांबेल आणि सुरक्षित वितरण होईल.सौर-पवन ऊर्जेचे प्रकल्प जिल्ह्याला हरित ऊर्जा उत्पादनाचं नवं केंद्र बनवता येईल. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) शहरातल्या गरीब व मध्यमवर्गीयांना परवडणारी घरं उपलब्ध होतील. अमृत २.० मिशन अंतर्गत पाणीपुरवठा, ड्रेनेज व स्वच्छता योजना झ स्वच्छ वातावरणामुळे आजारपण कमी होईल. बसस्थानक, रस्ते, उद्यानांचं आधुनिकीकरण प्रवास व दैनंदिन सोयीसुविधा सुधारतील. ई-वाहन चार्जिंग हब बीड जिल्हा ई-वाहन वापरासाठी पुढारलेला ठरेल. या प्रकल्पांमुळे बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होईल आणि जनतेच्या जीवनमानात मोठा फरक पडेल, असा विश्वासही खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, खा.सोनवणे हे सर्वांगिन विकासासाठी प्रयत्न करत असून केंद्रीय मंत्र्यांकडे ते बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न सातत्याने मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी अनेक मंत्र्यांच्या भेटी घेवून बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा सुरूच ठेवलेला आहे.



### सभागृहातही खा.बजरंग सोनवणेंचाच आवाज

**खा.बजरंग सोनवणे हे ग्राऊंड पातळीवरून आलेले नेतृत्व आहे. यामुळे ग्रामीण भागात काय आवश्यक आहे, याची जाणीव त्यांना आहे. विशेष म्हणजे, याच कारणाने ते दिल्लीतील सभागृहात बीडसह मराठवाड्याचे देखील प्रश्न मांडत असतात. यामुळे संसदेत महाराष्ट्रातून सर्वाधिक प्रश्न मांडणारे खासदार म्हणून सोनवणे यांच्याकडे पाहिले जात आहे.**

# क्रांतीनगर कानडी रोड वरील पाणीपुरवठा लाईनचे खड्डे ठरले मृत्यूचा सापळा

## एक तरुण गंभीर जखमी; यश कन्स्ट्रक्शनचा गलथानपणा

**केज । प्रतिनिधी**

क्रांतीनगर,कानडी रोड येथे सुमारे आठ महिन्या पूर्वी सिमेंट रस्ता पूर्ण झाला असला तरी पाणी पुरवठा पाईप लाईनचे काम अद्याप झालेले नाही.यश कंन्स्ट्रक्शन कंपनीने पाईप टाकण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूस खड्डे खोदले होते.मात्र हे खड्डे मुरूम न भरता तसेच उघडेच सोडलेले आहेत.यश कन्स्ट्रक्शन च्या गलथानपणामुळे परिसरातील नागरिकांना सातत्याने अपघातांना सामोरे जावे लागत आहे.नुकत्याच झालेल्या अपघातामुळे रात्री दहाच्या सुमारास परिसरातील लाईट गेल्या मुळे रस्त्यावर मोठा अपघात झाला. या अपघातात आकाश नावाचा तरुण गंभीर





जखमी झाला असून त्याच्यावर अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाटउसळली असून,यश कंन्स्ट्रक्शन च्या गुत्तेदाराचा निष्काळजीपणा व प्रशासनाची उदासीनता यामुळेच अपघात घडत आहेत अशी प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.याबाबत नागरिकांची स्पष्ट मागणी आहे की, तात्काळ खड्डे बुजवून रस्त्याचे काम पूर्ण करावे,अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा परिसरा तील नागरिकांनी दिला आहे.

# बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीत स्वतंत्रसमावेश करावा मागणीसाठी गोर सेनेचे तहसीलदारांना निवेदन

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती यादीत समाविष्ट करून स्वतंत्र आरक्षण टक्केवारी देण्याची मागणी गोर सेनेच्या वतीने मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की,सेंट्रल प्रोविन्स बेरार,नागपूरच्या शिफारसी आणि हैदराबाद गॅझेट लागू करण्याची अधिसूचना राज्य शासनाने केंद्रा कडे स्पष्ट शिफारसीसह पाठवावी.तसेच माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक,तत्कालीन शासनाचे निर्णय तसेच न्या.बापट आयोग व अन्य आयोगांनी दिलेल्या शिफारशी नुसार संविधानाच्या अनुच्छेद ३४२(२) प्रमाणे आरक्षण देण्यात यावे.मा.पंतप्रधानांच्या हस्ते झालेल्या नगारा



लोकार्पण कार्यक्रमात ही शासनाने आश्वासने दिली होती.तरीही अद्याप या समाजाचा प्रश्न प्रलंबित आहे,असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गोर सेनेच्या नेत्यांनी निदर्शनास आणले की, महाराष्ट्रातील बंजारा समाजाला इतर राज्यां प्रमाणे संविधानिक सवलती मिळालेल्या नाहीत.परिणामी तांड्या वरील जीवनमान अत्यंत हलाखीचे असून पायाभूत सुविधांच्या अभावामुळे अनेक तांडे रिकामे होऊन शहरी भागाकडे स्थलांतर होत आहेत.या मागणीसाठी निवेदन देताना देवानंद राठोड गोर सेना तालुकाध्यक्ष बालाजी राठोड,आत्माराम राठोड,प्रकाश राठोड, सुंदर राठोड,उत्तम राठोड,नवनाथ राठोड, सचिन राठोड,महादेव राठोड,सुधाकर पवार, नितीन राठोड,कृष्णा पवार,राहुल राठोड, नागेश राठोड,मधुकर पवार,अंकुश राठोड, सुनील राठोड,विकास राठोड आदींचा सहभाग होता.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या नंदुरबार जिल्हा सचिवपदी संदीप वळवी यांची निवड

**नंदुरबार । दिपक गोसावी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) वतीने नंदुरबार जिल्ह्यामध्ये नुकत्याच काही पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. या नियुक्त्यांमध्ये तळोदा तालुक्यातील मोरवड येथील संदीप राजेंद्र वळवी यांची जिल्हा सचिव म्हणून निवड करण्यात आली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते संदीप वळवी यांना त्यांच्या निवडीचे पत्र देण्यात आले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष अभिजीत मोरे हे देखील उपस्थित होते.मोरवडसारख्या ग्रामीण भागातील एका सामान्य कार्यकर्त्याला पक्षाने एवढ्या मोठ्या पदाची जबाबदारी दिल्यामुळे सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

आपल्या निवडीनंतर बोलताना संदीप वळवी म्हणाले की,राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार ,



जिल्हाध्यक्ष अभिजीत मोरे आणि पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो सार्थ करण्याचा मी पूर्ण प्रयत्न करेन. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जिल्ह्यात आणि विशेषतः तळोदा तालुक्यात आणखी बळकट करण्यासाठी मी काम करणार आहे.

# कामगारांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावा अन्यथा रस्त्यावर उतरू-अमर शेख

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील असंघटित कामगारांच्या रखडलेल्या कामांची तात्काळ सोय न झाल्यास आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशारा नगरसेवक व प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी कामगार आघाडी अमर शेख यांनी दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असंघटित कामगार आघाडी व विविध संघटनांच्या वतीने जिल्हा सरकारी कामगार अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील कामगारांचे अनेक प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित आहेत. त्यामुळे कामगार शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत.विशेषत: कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणे, कामगार सुविधा





केंद्र शहराजवळ उभारणे, कामगारांचे नूतनीकरण करणे, नवीन नोंदणी करून देणे तसेच अनेक कामगारांचे प्रलंबित दावे त्वरित मंजूर करणे या तातडीच्या मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.कामगारांचे हे प्रश्न गांभीर्याने सोडवले नाहीत तर शासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला.यावेळी शेख नासिर (जिल्हा अध्यक्ष कामगार संघटना, बीड), शीतलताई धोंडरे (समाजसेविका, बीड), सरलाताई पवार (अध्यक्ष राष्ट्रवादी कामगार आघाडी, बीड), प्रणितीताई पवार (नेकनूर जिल्हाध्यक्ष) व शेख शाकेर आदी मान्यवर उपस्थित होते.

# सातपुड्याच्या कुशीत वसलेला दहेल येथील धबधबा पर्यटकांचे मुख्य आकर्षण

**मोलगी । रवींद्र वळवी**

तालुक्यातील अतिदुर्गम भागातील दहेल येथील पांढऱ्याशुभ्र धारांनी कोसळणारा धबधबा सध्या पर्यटकांचे मुख्य आकर्षण बनला आहे. दरवर्षी पावसाळ्यात सातपुड्याच्या डोंगररांगांमधून अनेक धबधबे प्रवाहित होतात, जे पाहण्यासाठी सर्व वयोगटांतील पर्यटक सातपुड्याच्या कुशीत येतात. यातीलच दहेल येथील धबधबा पर्यटकांना विशेषतः भुरळ घालत आहे.

सातपुड्याच्या मध्यभागी असलेल्या दहेल गावाच्या चारही बाजूंनी डोंगररांगा आहेत. सातपुड्यातून वाहणाऱ्या नदीमुळे आणि विविध ठिकाणांहून झिरपणाऱ्या पाण्यामुळे दहेल परिसरात एकाच उभ्या डोंगरावर अनेक लहान-मोठे धबधबे तयार झाले आहेत. यामुळेच पर्यटकांचा ओढा दहेलकडे असतो. दहेलला पोहोचण्याचे मार्ग दहेल धबधब्याकडे जाण्यासाठी अक्कलकुवा येथून तीन मार्ग आहेत: पहिला मार्ग: अक्कलकुवा ते साकलीउमर ते सरी मार्गे, ज्याचे अंतर सुमारे ५० ते ५५ किलोमीटर आहे. दुसरा मार्ग: अक्कलकुवा ते आंबाबारी ते खाई ते ओहवा ते ओघानी मार्गे. तिसरा मार्ग: खापर ते मोरंबा ते होराफळी ते कोठली ते ओघानी मार्गे. याव्यतिरिक्त, गुजरात



राज्यातील देवमोगरा येथूनही चौथा मार्ग उपलब्ध आहे. पर्यटकांची गर्दी दहेल परिसरात अनेक धबधबे असल्याने महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातील अनेक पर्यटक येथे वनभोजन आणि पर्यटनासाठी गर्दी करतात. हे ठिकाण निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी उत्तम आहे. सुरक्षेची काळजी घ्या! दहेल येथील धबधबा जितका सुंदर दिसतो, तितकाच निष्काळजी आणि हुल्लडबाजी करणाऱ्या पर्यटकांसाठी धोकादायक ठरू शकतो. डोंगराचा उतार सरळ असल्याने येथे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही साधने नाहीत. परिसरात जोरदार वारे वाहत असल्याने डोंगराच्या कडेवर जाताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. छायाचित्र घेण्यासाठी धबधब्याजवळ जाण्याचा प्रयत्न करताना सुमारे १५० मीटरची धोकादायक पायपीट करावी लागते, त्यामुळे सुरक्षा नियमांचे पालन करणे महत्त्वाचे आहे.

# माकपची बाजी: बोरद गटातून श्रमिका दयानंद चव्हाण यांची उमेदवारी जाहीर!

**नंदुरबार । दिपक गोसावी**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने (माकप) बोरद गटातून तरुण आणि सुशिक्षित उमेदवार कॉम्रेड श्रमिका दयानंद चव्हाण यांच्या नावाची घोषणा केली आहे. दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी शहादा तालुक्यातील प्रकाशा येथे झालेल्या जिल्हा कमिटीच्या बैठकीत ही उमेदवारी बिनविरोध जाहीर करण्यात आली. विशेष म्हणजे अजून निवडणुकीचे आरक्षण देखील जाहीर झालेले नाही.



कॉम्रेड श्रमिका चव्हाण या शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांचे बी.एस्सी.पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले असून, त्या सध्या यूपीएससी परीक्षेची तयारी करत आहेत. त्यांच्या या शैक्षणिक पार्श्वभूमीमुळे आणि तरुण, तडफदार व्यक्तिमत्वामुळे सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे लागले आहे. विशेष म्हणजे, त्या बोरद गटाच्या माजी जिल्हा परिषद सदस्य कॉम्रेड इंदिराबाई चव्हाण यांच्या नात असून, बोरद ग्रामपंचायतीचे माजी सदस्य कॉम्रेड मंगलसिंग चव्हाण यांच्याही नात आहेत.माकपच्या या निर्णयामुळे इतर पक्षांनाही आता योग्य उमेदवाराची निवड करताना विचार करावा लागणार आहे. एका सुशिक्षित आणि राजकीय वारसा लाभलेल्या उमेदवाराला संधी देऊन माकपने निवडणुकीच्या रिंगणात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. या उमेदवारीमुळे बोरद गटातील निवडणूक चांगलीच रंगतदार होणार अशी चर्चा सुरू झाली आहे.

संपादकीय

# मांगल्य परत आणा



'राज्योत्सव' म्हणून जाहीर करण्यात आलेल्या गणेशोत्सवाची राज्यातील बहुतेक शहरांत रेंगाळणाऱ्या मिरवणुकांनी रविवारी सांगता झाली. 'डीजे'नामक कंठाळी ध्वनिवर्धकांच्या आणि ढोल-ताशांच्या दणदणाटांमुळे या मिरवणुकांतील पारंपरिक मांगल्य लोप पावले, त्यालाही अनेक वर्षे झाली. यंदा पुण्यासह अनेक ठिकाणी या दणदणाटाने ध्वनिप्रदूषणाची कमाल पातळी गाठली.यंदा राजकीय नेते गणेशोत्सवात वावरले; मात्र त्यांनी मिरवण्यापलीकडे उत्सवाला शिस्त लावण्यासाठी काहीही केले नाही, असे म्हणावे लागेल. उलट येऊ घातलेल्या पालिका निवडणुकांच्या चष्म्यातून त्यांनी उत्सवाकडे पाहिले. परिणामी उत्सवातील बेशिस्त वाढली.पुण्यातील मिरवणुकीने ३५ तासांचा नवा विक्रम नोंदवला; मुंबई आणि अन्य शहरांतही विसर्जनाला उशीर झाला. या मिरवणुकांत शहरे जणू वेठीस धरली गेली आणि सर्वसामान्य नागरिक मात्र हतबल झालेले दिसले. मिरवणुकीस होणाऱ्या विलंबाला जबाबदार कोण, यावर आता आरोप-प्रत्यारोप होत आहेत; पण हा विलंब होऊ नये, यासाठी कोणीच पुढाकार घेण्यास तयार नाही. सोलापूरसारख्या शहराने यंदा डीजेमुक्त मिरवणुकीचा नवा आदर्श घालून दिला; मुंबई, छत्रपती संभाजीनगर येथेही यंदा डीजेंचा दणदणाट नव्हता. मात्र, हे अपवादच म्हणावे लागतील.

गेल्या काही वर्षांत राज्य सरकार गणेशोत्सव 'निर्बंधमुक्त' करण्याचे ढोल वाजवित आहे. त्यातच यंदा स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नेतेमंडळींकडून निधीसाठी हात सैल सुटले होते. सरकारच्या भूमिकेतून घ्यायचा, तो बोध घेऊन पोलिस व अन्य यंत्रणाही नियमभंगांकडे दुर्लक्ष करताना दिसल्या. पुण्यात विसर्जन मिरवणूक लवकर पूर्ण करण्याबाबत केलेले 'सूक्ष्म नियोजन' प्रत्यक्षात कागदावरच राहिले. त्यामुळेच तासभर लवकर सुरुवात झाल्यानंतरही पुण्याची मिरवणूक तब्बल ३५ तास रेंगाळली. दुसरीकडे ध्वनिप्रदूषणाच्या नियमांनाच भर रस्त्यांवर टोलवण्यात येत होते. प्रदूषण मंडळासारख्या यंत्रणा ध्वनिपातळी मोजण्यापलीकडे काहीही करत नाहीत, याचाही प्रत्यय या मिरवणुकीत पुन्हा आला.

गेल्या काही काळात 'पारंपरिक' नावाखाली वाढीस लागलेल्या ढोल-ताशा पथकांमध्ये दीडशे-दोनशे वादकांनी तास न तास रस्ते अडवले आणि काहींनी दादागिरी करीत नागरिकांनाही वेठीस धरले. गेल्या काही वर्षांत ठरलेल्या वेळी, मध्यरात्री ध्वनिवर्धक बंद झाल्यावर बहुतांश मंडळांच्या मिरवणुका जागीच थांबतात आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा नव्या उत्साहाने सुरू होतात, यंदाही या मिरवणुका रविवारी सायंकाळपर्यंत लांबल्या. त्यामुळे अनंत चतुर्दशीला होणारे विसर्जन होण्यासाठी पौर्णिमा उजाडली. पुण्याचाच विचार केला, तर पालकमंत्री-केंद्रीय मंत्री मिरवणुकीला सुरुवात केल्यानंतर पुन्हा दिसले नाहीत. पूर्वी शहराचे महापौर ही जबाबदारी सांभाळत, गेली काही वर्षे ती खुर्चीही रिकामी आहे. त्यामुळेच न्यायालयाचे आदेश, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न, मंडळांमधले मानपान आणि नागरिकांना होणारा त्रास अशा गुंतागुंतीच्या प्रश्नातून कोण मार्ग काढणार, हा मोठा प्रश्नच आहे.गणेशोत्सवाला राज्योत्सवाचा दर्जा देऊन उत्सवाचा 'इव्हेंट' करण्याच्या व्यतिरिक्त हाती काय लागले, याचा आढावा घेण्याची नितांत गरज आहे. दहा दिवसांचा उत्सव आणि मिरवणुकांमध्ये लाखो नागरिक रस्त्यावर आले होते. त्यांच्यासाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे यासारख्या मूलभूत सुविधा पुरविण्यापासून अनेक कामे याअंतर्गत करण्यासारखी आहेत, याचा पुढील वर्षीपासून तरी विचार व्हावा.राज्यभरात काही अपवाद वगळता अनुचित प्रकार न घडता मिरवणुका शांततेत पार पडल्या, याचे श्रेय यंत्रणांना द्यावे लागेल. उत्सवकाळात पोलिस, गृहरक्षक दल, स्वच्छता कर्मचारी, वीज कंपन्या आणि स्वयंसेवक असे लाखो हात राबले, तेही गौरवास पात्र आहेत. मात्र, दिवसेंदिवस होणारा विलंब, बेशिस्त आणि ध्वनिप्रदूषण या गोष्टींमुळे उत्सवाचे, विशेषत: मिरवणुकांचे होत असलेले विकृतीकरण रोखून मांगल्य परत आणण्याची काळजी घेण्यासाठी नागरिकांनीच सरकारवर दबाव आणायला हवा.

# कडवई स्मशानभूमी वृत्ताची आमदार शेखर निकम यांनी घेतली दखल

**संगमेश्वर | प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यातील कडवई वाणीवाडी , बाजारपेठ, समर्थनगर येथील स्मशानभूमी कडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने वाहत्या नदीच्या प्रव्हश्रतून कराव्या लागणाऱ्या खडतर प्रवासावर चार दिवसांपूर्वी सोशल मीडियावर आणि वृत्त पत्रातून प्रकाश टाकण्यात आला होता. याची तात्काळ दखल घेत आमदार शेखर निकम यांनी येथील ग्रामस्थांची एक बैठक आयोजित करत दुसऱ्याच दिवशी सदर रस्ता व साकवाचे अंदाजपत्रक करण्याचे आदेश जिल्हापरिषद बांधकाम विभागाला दिले होते . त्याप्रमाणे आज सदर कामाची पहाणी करून अंदाजपत्रकाची प्रक्रिया सुरू झाली . त्यामुळे येथील ग्रामस्थांनी आमदार निकम यांचे आभार मानले असून लवकरच ही समस्या दूर होईल अशी आशा व्यक्त केली आहे . कडवई वाणीवाडी , बाजारपेठ व समर्थनगर याना अंत्यविधीसाठी असणाऱ्या स्मशानभूमी कडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने गेली साठ वर्षे येथील ग्रामस्थांची फार





मोठी गैरसोय होत आहे. पावसाळ्यामध्ये नदीच्या पाण्यातून शव नेताना ग्रामस्थांना मोठी कसरत करावी लागत आहे .

याची दखल घेत आमदार शेखर निकम यांनी उपसरपंच दत्ताराम ओकटे याना समबंधित ग्रामस्थांची तात्काळ बैठक आयोजित करण्याचे सांगितले . त्याप्रमाणे दोन दिवसांपूर्वी कडवई हनुमानमंदिर येथे आमदार शेखर निकम यांच्या उपस्थितीत ही बैठक आयोजित करण्यात आली .यावेळी आमदार निकम यांनी ही समस्या तात्काळ सोडवण्याचे आश्वासन उपस्थित ग्रामस्थांना दिले .तात्काळ दुसऱ्याच दिवशी सदर कामाची पाहणी करून अंदाजपत्रक सादर करण्याचे आश्वासन आमदार निकम यांनी जिल्हापरिषद बांधकाम विभागाला दिले . त्यानुसार आज जिल्हापरिषद बांधकाम विभागाचे अभियंता ओंकार कुंभार व देशपांडे यांच्या उपस्थितीत या जागेची पहाणी करण्यात आली .लवकरच या कामाचे अंदाजपत्रक तयार करून ते मंजुरीसाठी पाठवण्यात येईल व ही समस्या सोडविली जाईल अशी माहिती यावेळी राष्ट्रवादी चे नेते व आरडीसी बँकेचे संचालक राजेंद्र सुर्वे यांनी ग्रामस्थांना दिली .यावेळी कडवई उपसरपंच दत्ताराम ओकटे , आमदार निकम यांचे स्वीयसहायक संजय कदम , माजी सरपंच संदेश सागवेकर ,वरदान क्रीडामंडळाचे अध्यक्ष प्रवीण प्रसादे,अमित खातू, मयूर लिंबूकर ,भगवान नारकर ,मुस्ताक सावंत ,आदी ग्रामस्थ उपस्थित होते .

फोटो .स्मशानभूमी कामाची पाहणी करताना ग्रामस्थ व अधिकारी उपस्थित होते.

# शिक्षकच आहेत जीवनातील दीपस्तंभ-सुधीर घरत

**उरण | प्रतिनिधी**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती संपूर्ण भारतामध्ये शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते. याच शिक्षक दिनाचे औचित्य साधून सुधीर घरत सामाजिक संस्था, नवघर- उरण यांच्या विद्यमाने वीर वाजेकर महाविद्यालयातील शिक्षकांचा गुणगौरव समारंभ दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता.महाभारतातील युद्धाचा संदर्भ देत कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा महाविद्यालय विकास समिती सदस्य सुधीर घरत म्हणाले की, कौरव हे पांडवांपेक्षा सैन्य संख्या, सेनानी आणि विविध दले तसेच पराक्रमी योद्धे या सर्वच बाबतीत वरचढ होते ,परंतु कौरवांकडे कृष्णासारखा मार्गदर्शक नव्हता म्हणूनच पांडव युद्ध जिंकू शकले. जीवनात मार्गदर्शक हा नेहमी दीपस्तंभासारखे कार्य करतो. तो आपल्याला योग्य वाटेवर मार्गक्रमण करण्यासाठी प्रकाश दाखवत असतो. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे सध्याचा काळ आव्हानात्मक असला तरी समाजातील भावी पिढी घडवण्यासाठी शिक्षक त्यांच्या परीने चांगले प्रयत्न करीत आहेत. याच चांगल्या प्रयत्नांना



दाद म्हणून आमच्या संस्थेने वीर वाजेकर महाविद्यालयातील शिक्षकांचा गौरव केला आहे.असे मनोगत सुधीर घरत यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर सर यांनी देखील याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त केले.शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक असून त्याच्या कृतिशील व गतिशील विद्यार्थांना प्रेरित करून सदृढ समाज परिवर्तनाचे कार्य करू शकतो. या गौरवामुळे प्रेरित होऊन आणखी चांगल्या प्रकारे काम करण्याची ऊर्जा मिळाली अशा भावना डॉ आमोद ठक्कर यांनी व्यक्त केल्या.या शिक्षक दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनी हर्षदा महाकाळ आणि प्रणाली सपकाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या शिक्षक गुणगौरव समारंभ प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक,प्रशासकीय सेवक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पेन, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले.या कार्यक्रमात महाविद्यालयातील नॅशनल कॅडेट कोर मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना देखील सी सर्टिफिकेट तसेच विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याशिवाय महाविद्यालयातर्फे माजी विद्यार्थी सुधीर घरत पुरस्कृत आयोजित राष्ट्रीय फोटोग्राफी स्पर्धेचे निकाल देखील जाहीर करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. गजानन चव्हाण यांनी तर कार्यक्रमाचे आभार स्टाफ वेल्फेअर कमिटीच्या चेअरमन सुप्रिया नवले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात डॉ. सुजाता पाटील व डॉ. श्रेया पाटील यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमास शोभा आली. महाविद्यालयातील स्टाफ वेल्फेअर कमिटीने या कार्यक्रमाच्या आयोजनात पुढाकार घेतला.महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, प्रशासकीय सेवक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.


# ती सजली..नटली..प्रवाशांच्या सेवेसाठी

## टेरव येथील रिक्षा चालक परेश काणेकर यांची भन्नाट कल्पना


### रिक्षातून दिल्या प्राथमिक सेवा व शिव विचार प्रवाशांना रिक्षा टेरवची कन्या नावाने चिपळूणमध्ये फेमस

**संगमेश्वर | प्रतिनिधी**

प्रत्येक शहरात आणि ग्रामीण भागात आपल्याला रिक्षा वाहन दिसते. शहरात याचे प्रमाण जास्त आहे. प्रत्येक रिक्षा चालक आपल्या वाहनातून प्रवाशांनी प्रवास करावा त्यासाठी नवनवीन कल्पना वापरत असतात. अशीच एक भन्नाट युक्ती वापरत टेरव येथील परेश काणेकर या युवकाने स्वतःची रिक्षा अशी सजवली आहे की, सध्या ती टेरवची कन्या एम एच ०८ -ट९२७१ र नावाने चिपळूण शहरात फेमस आहे. या रिक्षात अनेक सेवा उपलब्ध करून देताना प्रवाशांना छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन होत असून शिव विचार सुद्धा जपला आहे. चिपळूण तालुक्यातील टेरव राधाकृष्ण वाडी येथील परेश पांडुरंग काणेकर या युवकाने स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी रिक्षा चालविण्याचे ठरविले. त्यानुसार रिक्षा खरेदी केली. गेले काही महिने त्याने चिपळूण शहरात रिक्षा चालवत प्रवाशांशी एक जिव्हाळ्याचे नाते तयार केले. त्याच्या रिक्षातून प्रवासी प्रवास करताना त्यांच्यातील चर्चा त्याच्या कानावर पडत असत.यातूनच परेश यांच्या मनात वेगळी कल्पना







सुचली. त्यानेही विचार केला. कधी प्रवासात नेटवर्क असते किंवा नसते ही. कधी अचानक काही झाले तर प्राथमिक उपचार करता येतील का? पुढे यातून पराग काणेकर यांची टेरवची कन्या सजली ती प्रवाशांसाठी सेवा सुविधा घेऊनच. या रिक्षा चालकाने स्वतःची रिक्षा अशी सजवली की, त्या रिक्षात प्रवाशांना त्यांनी काही सेवा पुरवल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी खास आरोग्यासाठी प्रथमोपचार पेटी बसवली आहे. त्यानंतर वर्तमान पत्र ठेवण्यासाठी एक छोटी पेटी तयार केली. त्यात ठराविक वृत्तपत्र ठेवले जातात. प्रवास करताना प्रवासी पेपर वाचू लागले. त्यानंतर फ्री वायफाय सुविधा ठेवली आहे. मोबाईल चार्जिंगसाठी सुविधा आहे. जेणेकरून प्रवास करताना एखाद्याचा मोबाईल चार्जिंग अभावी बंद असेल तर तो चार्ज करू शकेल. त्यानंतर खास कॉलेज तरुणी आणि महिला यांच्यासाठी मेकअपचे सामान ठेवले असुन त्यात कंगवा, मुलांसाठी गोल कंगवा, खोबरेल तेल, पावडर, लिपस्टिक, काजळ आणि स्वतःचा सुंदर चेहरा बघण्यासाठी मोठा आरसा बसवला आहे. त्यांच्या रिक्षातून कॉलेजचे तरुण, तरुणी प्रवास करतात. त्यांना असणाऱ्या सुविधा या रिक्षात मिळत आहेत. चालकाचा स्वभावा मनमिळावू असल्याने प्रवासी या टेरव कन्या नावाच्या रिक्षातून प्रवास आवडीने करतात. पुढे स्वामी समर्थ तर मागे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाची प्रतिमा बसवली आहे. यातून ते शिव विचार पेरण्याचा आणि जपण्याचा प्रयत्न करीत आहेत. याशिवाय चिपळूण मधील प्रेक्षणीय स्थळे यांची नावे आणि ते ठिकाण शहरापासून किती किलोमीटर अंतरावर आहे याची ही माहिती रिक्षात लावली आहे. रिक्षा चालक यांनी एवढी सजगता दाखवत त्यांनी प्रवाशांना एक आरामदायी आणि सुंदर सवारी उपलब्ध करून दिली आहे. रिक्षातून रात्रीचा प्रवास करताना आतील आणि बाहेरील वीज रोषणाई तर कमाल आहे.

सध्या या टेरवच्या कन्येला ही (रिक्षा) प्रवाशांची पसंती मिळत आहे. सर्वांनीच परेश काणेकर यांच्या कल्पनेचे आणि सेवेचे मनापासून कौतुक केले आहे.

# उरण मध्ये दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबिर संपन्न







**उरण | प्रतिनिधी**

दि. ०८/०९/२०२५ रोजी शासकीय ग्रामीण रूग्णालय उरण या रूग्णालयात जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग व मा. मुख्यमंत्री सहायता निधी धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबिर घेण्यात आले या शिबिरात डॉ. विजय मसकर(मानसोपचार तज्ञ), डॉ. मृणालीली कदम (अस्थिव्यंग तज्ञ ), डॉ. पवन महाजन (नेत्ररोग तज्ञ), डॉ. बाबासो काळेल (वैद्यकीय अधीक्षक) ग्रामीण रुग्णालय उरण, राजू ठाकूर सामाजिक कार्यकर्ते व उरण दिव्यांग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्र म्हात्रे उपस्थित होते.

या शिबिरात अस्थिरोग तपासणी, नेत्र तपासणी, मानसिक आजाराची तपासणी करून दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यामध्ये एकूण ११० दिव्यांग लाभार्थींनीं नोंद केली व त्यातील पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करून तपासणी करून व कागदपत्राची पडताळणी करून दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासो काळेल - वैद्यकीय अधीक्षक इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय उरण तसेच इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष मेहनत केली. तसेच उरण तालुक्यातील सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# शिक्षकांनी ज्ञानदानातून सक्षम पिढी घडवून विकसित भारताची संकल्पना साकार करावी-प्रा.राम शिंदे



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुसंस्कार व नवी दिशा देण्याचे काम शिक्षक करतात. विकसित भारताची संकल्पना साकारण्यासाठी शिक्षकांनी ज्ञानदानातून सक्षम पिढी घडवावी. शिक्षण क्षेत्रात जिल्हा राज्यात अव्वल राहण्यासाठी अधिक प्रयत्न करा, असे आवाहन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

शहरातील द्वारका लॉन्स येथे जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२२, २०२३ व २०२४ या वर्षातील जिल्हा शिक्षक पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार विठ्ठलराव लंघे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड, दिलीप भालसिंग, अनिल मोहिते, विनायक देशमुख आदी उपस्थित होते.

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मनाची व विचारांची ज्योत प्रज्वलित करणारे, त्यांच्या कलागुणांना वाव देणारे, विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारे हे शिक्षकच असतात. नवीन पिढी घडविण्याचे कामही शिक्षक करत असतात. यामुळेच समाजामध्ये शिक्षणाला अधिक महत्त्व आहे. ग्रामीण भागामध्ये शिक्षण व समाजजीवन हे दीपस्तंभ ठरते. गावातील सामाजिक क्रांती घडविण्याचे कार्य ज्ञानदानातून शिक्षक करत असतात. समाजामध्ये शिक्षकांना मोठा मान आहे. नवी पिढी घडविण्याचे काम शिक्षकांमार्फत होत असल्याने समाजाचे शिल्पकार हे शिक्षकच आहेत.

शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नसून जीवन जगण्याची दिशा देणारी प्रक्रिया आहे. नव्या शैक्षणिक धोरणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शिक्षकांनी आपले ज्ञान व अध्यापन पद्धती अद्ययावत ठेवली पाहिजे. राज्यात शिक्षणक्षेत्रात जिल्हा ५ व्या क्रमांकावर आहे. जिल्हा राज्यात अग्रेसर रहावा, यादृष्टीने सर्वंकष प्रयत्न करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिक्षक हा राष्ट्र व समाजाच्या उत्कर्षाच्या प्रक्रियेतील प्रमुख घटक –

पालकमंत्री डॉ.विखे पाटील म्हणाले, विविध आव्हाने समर्थपणे पेलून, शिक्षण परिघाच्या पलीकडे जाऊन शिक्षकांनी प्रयोगशीलतेतून ज्ञानदान केले व त्यामुळे जिल्ह्याचा नावलौकिक राज्यभर वाढवला. ही बाब जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. शिक्षक हा राष्ट्र व समाजाच्या उत्कर्षाच्या प्रक्रियेतील प्रमुख घटक आहे.

शाळांतून दिलेल्या ज्ञानदानातूनच राष्ट्र व समाजाच्या भवितव्याची दिशा तरुण पिढी ठरवणार आहे. ज्ञानाचा कक्षा रुंदावतांना शिक्षक विद्यार्थ्यांसाठी शिडी धरतात व विद्यार्थी उद्याची वाटचाल करतात. शिक्षकांशिवाय राष्ट्राची व समाजाची प्रगती अशक्य असल्याने ज्ञानाची साधना अखंडपणे सुरू ठेवण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

आजघडीला आधुनिक तंत्रज्ञानावरील शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शैक्षणिक पद्धतीमध्ये होणाऱ्या बदलांचे शिक्षकांपुढे मोठे आव्हान असून शिक्षकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. ज्ञानाने समृद्ध झालेला आपला देश असून या ज्ञानदानाचे काम अत्यंत समर्पित भावनेतून शिक्षकांकडून व्हावे, अशी अपेक्षाही श्री.विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

आमदार विक्रमसिंह पाचपुते म्हणाले, जिल्ह्याच्या अनेक खासगी संस्थेमधून जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे व हे केवळ शिक्षकांमुळे शक्य झाले आहे. केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देणे एवढेच शिक्षकांचे कार्य नसून समाजाला साक्षर व सुशिक्षित करण्याची जबाबदारीही शिक्षकांचीच असल्याचेही ते म्हणाले.

आमदार काशिनाथ दाते म्हणाले, खासगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदांच्या शाळांमधून अधिक दर्जेदार शिक्षण मिळत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांतील अनेक विद्यार्थी प्रशासनामध्ये मोठ्या पदावर काम करत असून ही अत्यंत भूषणावह बाब असल्याचे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, अत्यंत दुर्गम भागात शाळा असतानाही येणारी आव्हाने पेलून समाजातील गोरगरीबांच्या पाल्यांना शिक्षणदानाचे मोठे कार्य शिक्षकांमार्फत केले जाते. शिक्षकांच्या या कामातून इतरांनीही प्रेरणा घ्यावी. शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी दिला जाईल, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात आनंद भंडारी म्हणाले, जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ३ हजार ५३४ प्राथमिक शाळांच्या माध्यमातून २ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विविध उपक्रम राबवत या शाळांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. मिशन आपुलकी, मिशन आरंभ हे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवले जात असून याद्वारे जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्ता उंचावत आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जिल्हा शिक्षक पुरस्कारांची निवड उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांची अत्यंत पारदर्शकपणे करण्यात आली आहे.

यावेळी सन २०२२, २०२३ व २०२४ या वर्षातील जिल्हा शिक्षक पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. कार्यक्रमास पदाधिकारी, अधिकारी यांच्यासह शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सौ.सोनाली कुलथे यांची महिला युवती कार्याध्यक्षपदी निवड तर मयुरी म्हस्के युवती तालुका सचिव



**अहिल्यानगर** । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सन्माननीय अजित दादा पवार साहेब तसेच प्रदेशाध्यक्ष सुनीलजी तटकरे साहेब आदिती ताई तटकरे सन्माननीय रूपालीताई चाकणकर यांच्या मार्गदर्शनाखाली व पारनेर तालुक्याचे आमदार काशिनाथ जी दाते सर जिल्हाध्यक्ष अशोकरावजी सावंत जिल्हा उपाध्यक्ष कापसे सर जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत दादा गायकवाड तसेच जिल्हा सरचिटणीस नितीन म्हस्के महिला जिल्हा कार्याध्यक्ष सुधामती ताई कवाद सोना ताई चौधरी मॅडम तालुकाध्यक्ष सुषमाताई रावडे युवती तालुकाध्यक्ष अपर्णाताई खामकर तालुकाध्यक्ष विक्रम सिंह कळमकर युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे युवा नेते विजुभाऊ औटी प्रितेश भाऊ पानमंद सर्वांच्या उपस्थित पक्षाचे आढावा बैठक घेण्यात आली यामध्ये या वैशालीताई किरण शेटे युवती तालुका सरचिटणीस विद्या भूषण आवारी युवती तालुका खजिनदार जयश्री ताई प्रदीप रोकडे युवती तालुका प्रवक्ता शितल संदेश म्हस्के युवती तालुका उपाध्यक्ष सना हमीद पठाण युवती तालुक सरचिटणीस अनिशा राहुल जाधव युवती तालुका चिटणीस मयुरी नितीन म्हस्के युवती तालुका सचिव सौ नीलम सतीश गोसावी युवती तालुका शहराध्यक्षया नवीन पदनियुक्त देण्यात आल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला युवतींची नवीन पदावर नियुक्ती करण्यात आली

## ओणम उत्सव संपन्न





**नवी मुंबई । प्रतिनिधी**

सांस्कृतिक समिती व आयक्यूएसी (IQAC) यांच्या संयुक्त जे.के. कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स येथे ओणम हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय ज्ञान परंपरेचा गौरव अधोरेखित करण्यासाठी आणि इंडियन नॉलेज सिस्टीम (IKS) च्या चौकटीत या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश सांस्कृतिक मूल्ये आणि परंपरा जपणे तसेच विद्यार्थी व शिक्षकांमध्ये एकात्मतेची भावना दृढ करणे हा होता.विविध शाखांमधून एकूण ६१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व आपली सर्जनशील अभिव्यक्ती सादर करून परिसरात उत्सवमूर्ती वातावरण निर्माण केले. फ्लोरल रंगोली स्पर्धेने परिसराला सौंदर्य आणि रंगांची सजावट मिळवून दिली, तर कोको फेस्ट - पाककला स्पर्धेने ऊर्जा, उत्साह आणि आनंद द्विगुणित केला. सांस्कृतिक आकर्षणात भर घालत सर्वोत्कृष्ट वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्सवी वातावरण अधिक रंगतदार केले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थी परिषद २०२५-२६ च्या बैजिंग सेरेमनीने झाली, ज्यामध्ये नव्याने निवडून आलेल्या परिषद सदस्यांना औपचारिकरित्या सन्मानित करण्यात आले आणि त्यांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.या उत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे प्राध्यापकवर्ग, अप्रशिक्षित कर्मचारी व सहाय्यक कर्मचारी यांचा मनःपूर्वक सहभाग होता. त्यांनी उत्साहाने विविध उपक्रमात सहभाग घेतला व आयोजन यशस्वी होण्यासाठी सहकार्य दिले.प्राचार्या डॉ. श्रद्धा भोमे यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली तसेच आयक्यूएसी समन्वयक रेम्या अनिल कुमार, प्राध्यापक व आयोजन समिती यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा कार्यक्रम भव्य यशस्वी ठरला. हा उत्सव केवळ ओणमच्या सांस्कृतिक साराचा प्रत्यय देणारा नव्हता, तर त्यातून एकात्मता, परंपरा व सौहार्द यांचा सुंदर संगम घडून आला.

## गावाची लेक ठरलेल्या शिक्षिकेला अश्रुपूर्ण निरोप



**अहिल्यानगर** । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इनामवस्ती, माळकुप (ता. पारनेर) येथील शिक्षिका हेमलता पुराणे यांचा बदली आदेश आल्यानंतर संपूर्ण गाव भावुक झाला. ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थ्यांनी त्यांना सन्मानपूर्वक निरोप देताना गावकऱ्यांनी शाळेत सरपंच संजय काळे यांच्या अध्यक्षतेखाली निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. गेल्या सहा वर्षांपासून पुराणे मॅडम यांनी केवळ अभ्यासच नाही तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी क्रीडा, वकृत्व, सांस्कृतिक कार्यक्रम, सहली यांसारखे उपक्रम राबवले. शाळेच्या भौतिक सुविधा उभारणीसाठी केलेले योगदानही लक्षणीय होते. त्यामुळे गावकऱ्यांच्या मनात त्यांनी खास स्थान मिळवले.आईच्या मायेने विद्यार्थ्यांची काळजी घेणाऱ्या पुराणे मॅडममुळे पालकांच्या आर्थिक अडचणी हलक्या झाल्या, तर विद्यार्थ्यांच्या डोळ्यात नव्या स्वप्नांची ज्योत पेटली. म्हणूनच त्यांच्या बदलीच्या बातमीने गावकऱ्यांचे हृदय भरून आले. अनेक विद्यार्थ्यांनी डोळ्यात अश्रू आणून आता आमच्या मॅडम शाळेत दिसणार नाहीत अशी खंत व्यक्त केली.एका सुखवस्तू कुटुंबातून येऊनही आदिवासी बहुल भागात सेवा करण्याची त्यांची जिद्द व कर्तव्याच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याची धडपड यामुळे पुराणे मॅडम गावाची लेक ठरल्या. त्यांना निरोप देताना गावकऱ्यांनी अगदी आपली मुलगी सासरी जाताना द्यावा तसा अश्रुपूर्ण निरोप दिला.गावातील लोकांच्या मते - अनेकांना सेवापूर्तीच्या शेवटच्या दिवशीही एवढे प्रेम मिळत नाही, ते हेमलता मॅडमनी केवळ सहा वर्षांत मिळवले.

यावेळी उपस्थित मान्यवर - शाळा व्यवस्थापण समिती अध्यक्ष सौ. मंगल नाबगे, सौ. गितांजली नाबगे , सौ. सिमा नाबगे , सौ. पट्टेकर मॅडम,उपाध्यक्ष श्री. सुधीर गवळी, पत्रकार श्री. शिवशंकर शिंदे , माजी सरपंच श्री. बाळासाहेब शिंदे, युवा नेते व हमाल पंचायत उपाध्यक्ष श्री. किरण शिंदे, श्री. प्रगतशिल शेतकरी श्री. शरद नाबगे ( सावकार ) श्री. रामदास गवळी, श्री. अरुण गवळी , श्री. अर्जुन शिंदे, व आदि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## बँक ऑफ इंडिया कसबा शाखेत वर्धापनदिन उत्साहात



**संगमेश्वर । प्रतिनिधी**

बँक ऑफ इंडियाचा १२० वा वर्धापन दिन संगमेश्वर तालुक्यातील कसबा या गशाखेत विविधांगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या वेळी सुरवातीला बँक ऑफ इंडियाच्या विविध ग्राहकाभिमुख योजनांची माहिती देण्यात आली. या वेळी बँकेच्या कसबा शाखेलाही ४३ वर्ष पूर्ण झाली गावच्या प्रथम नागरिक सरपंच पुजा लाणे यांच्या हस्ते केक कापून बँकेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. बँकेला वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा देताना सुजित महाडिक यांनी सांगितले, या बँकेच्या माध्यमातून कसब्यासारख्या शाखेत भविष्यात अनेक सामाजिक उपक्रम राबवावेत जेणेकरून बँक आणि येथील जनता यांच्यात आपुलकीचं आणि आत्मियतेचे नाते निर्माण होईल. बँकेचे शाखा व्यवस्थापक आशिष नागतोडे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे विशेष स्वागत करण्यात आले. सदर कार्यक्रमाला सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक तसेच ग्राहक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखा व्यवस्थापक भ आशिष नागतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपव्यवस्थापक आदर्श गाडगे, मयुर धाकतोडे,रेखा गुडेकर सुडलाईफ कंपनी असिस्टंट भुषण दळवी, प्रसाद सुर्वे, अभिजीत इंदुलकर,बँक मित्र दिगंबर लिंगायत यांनी मेहनत घेतली.

# रिटेवाडी उपसा सिंचन योजनेसाठी संघर्ष तीव्र; शासनाने त्वरित दखल न घेतल्यास पुण्यात बेमुदत उपोषणाचा इशारा

**सोलापूर । प्रतिनिधी**

रिटेवाडी उपसा सिंचन योजना मार्गी लावण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. रिटेवाडी उपसा सिंचन संघर्ष समितीने सोमवार, दि. १५ सप्टेंबर रोजी करमाळा तहसील कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने तातडीने याकडे लक्ष न दिल्यास ७ ऑक्टोबरपासून पुण्यातील सिंचन भवनासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा समितीने दिला आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत या योजनेच्या लाभक्षेत्रातील ४० गावांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. त्यावेळी सर्व राजकीय नेत्यांनी निवडणुकीनंतर योजना मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजवर कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने ग्रामस्थ आणि शेतकरी शासनाची सरळ फसवणूक झाल्याचे मानत आहेत. सोमवारी सकाळी १० ते सायंकाळी ५.४५ या वेळेत तहसील कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन होणार असून पुढच्या टप्प्यात पुण्यात उपोषण होईल. निवेदन सभेत ४० गावांचे माजी व विद्यमान सरपंच, उपसरपंच, पंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वारंवार पाठपुरावा करूनही फक्त आश्वासन मिळत असल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. या आंदोलनांना संघटित स्वरूप देण्यासाठी करमाळा शहरातील जीन मैदान येथील कै. नामदेवराव जगताप व्यापारी संकुलात संपर्क कार्यालयही सुरू करण्यात आले आहे. ग्रामस्थांनी आंदोलनात सहभागी व्हावे यासाठी अंकुश शिंदे (९३७३७२५५२४), मदन पाटील (९४२०११७०३५) आणि सुभाष बलदोटा (९७६३२२०८३२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन समितीने केले आहे.



# रुग्णालयाजवळ चार लाखांची पिशवी हिसकावली

# आंध्रचे आरोपी केज पोलिसांच्या जाळ्यात!

## सीसीटीव्ही फुटेजवरून उघडकीस आली धाडसी चोरीची घटना

## केज पोलिसांच्या वेगवान कारवाईने आरोपींना मिळाला गजाआड प्रवास

### पोलिसांच्या या कारवाईमुळे सर्वत्र कौतुक

**केज । गौतम बचुटे**

केज येथील सरकारी दवाखान्या जवळ चार लाख रु पिशवीत ठेवून मोटार सायकवरून गावाकडे जात असलेल्या ऊसतोड मुकादमाच्या हातातील चार लाख रु. असलेली पिशवी, मोटार सायकल वरून आलेल्या दोघांनी हिसकावून घेत पळून गेलेल्या आंध्रप्रदेशाच्या किनारपट्टी भागातील आरोपींना परभणी येथील कारागृह प्रशासना कडून ताब्यात घेत प्रकरणाचा तपास लावला आहे.२९ जुलै रोजी केज येथून तिघेजण चार लाख रु. घेऊन आडस जवळील मानेवाडीकडे जात असताना राष्ट्रीय महामार्गावर केज येथील सरकारी उपजिल्हा रुग्णालया जवळ मोटार सायकलवरून आलेल्या दोघा अज्ञात चोरट्यांनी ४ लाखाची रक्कम असलेली हातातील पिशवी हिसकावून घेत पळून गेले होते. केज पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेज आधारे धाडसी चोरीची घटना उघडीस आणली. जसवंत उर्फ जश्यु शिवा पिटला वय (१८ वर्ष) आणि प्रसंगी उर्फ सन्नी एलिया चल्ला वय (३३ वर्ष) हे दोघेही आंध्रप्रदेशातील किनारपट्टी भागातील नेल्लोरे जिल्ह्यातील कप्पारालथिलप्पा ता. कावली येथील रहिवाशी असून त्यांना सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे आणि पोलिस कॉन्स्टेबल बजरंग मुंडे आणि संदीप माळी यांनी त्या दोघांना दिनांक १० सप्टेंबर रोजी परभणी येथील जिल्हा कारागृहातून न्यायालयाच्या आदेशाने ताब्यात घेतले आहे. या बाबतची सविस्तर माहिती अशी की, दि. २९ जुलै मंगळवार रोजी केज तालुक्यातील उत्तरेश्वर उत्तम धायगुडे (रा. मानेवाडी ता. केज) हे त्यांचे मेहुणे रमेश वैजेनाथ माने याने त्यांना देण्यासाठी अंबाजोगाई येथील आयडीबीआय बँकेतून चेकद्वारे काढलेले चार लाख रु. घेऊन केज येथे आले होते. उत्तरेश्वर धायगुडे यांच्या सोबत त्यांचा मेव्हणा रमेश माने आणि पुतण्या अशोक धायगुडे हे तिघे मोटार सायकली वरून चार लाख रु. पांढऱ्या रंगाच्या कॅरी बॅगमध्ये घेऊन केज येथे आले होते. ते चार लाख रु. त्यांना केज येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अंबाजोगाई रोड वरील पेट्रोल पंपा समोर असलेल्या शाखेत जमा करून आरटीजीएस द्वारे कोल्हापुर येथील शिरोली एमआयडीसी मधील विवेक इंजिनिरींग वर्कस यांच्या खात्यावर नवीन ट्रॅक्टरच्या दोन ट्रॉली खरेदीसाठी पाठवायचे होते. परंतु त्यांना केजला यायला उशीर झाल्याने बँकेचा व्यवहार बंद झाल्यामुळे ते तिघे दुपारी ४:३० वा. च्या सुमारास मोटार सायकल वरून त्यांच्या गावी मानेवाडीकडे जाण्यासाठी निघाले होते. ते तिघे केजच्या बाहेर आल्या नंतर एका पुला जवळ लघुशंकेला थांबले. त्या नंतर ते गावाकडे जात असताना उत्तरेश्वर धायगुडे हे हात चार लाख रुपये असलेली पिशवी घेवुन मोटार सायकलवर सर्वात पाठीमागे बसले होते. ते तिघे अंबाजोगाई रोडने जात असताना केज येथील उपजिल्हा रुग्णालया पासून २०० मिटर अंतरावर असताना त्यांच्या पाठी मागुन एक भरधाव वेगात मोटार सायकल आली. त्या मोटार सायकलवर दोन तरुण बसलेले होते. त्यातील पाठी मागे बसलेल्या एकाने उत्तरेश्वर धायगुडे यांच्या हातातील चार लाख रुपये असलेली पांढऱ्या रंगाची कॅरीबॅग हिसकावुन घेतली आणि वेगात अंबाजोगाईच्या रस्त्याने निघुन गेले होते. तेव्हा उत्तरेश्वर धायगुडे यांनी आरडा ओरड करून त्या त्यांचा दोन कि मी पर्यंत पाठलाग केला, पण ते त्यांना सापडले नव्हते.





उत्तरेश्वर धायगुडे यांच्या फिर्यादी वरून केज पोलीस ठाण्यात वाटमारी करून चार लाख रु. हिसकावून घेऊन पळून गेलेल्या दोन अनोळखी तरुणा विरुद्ध गु. र. नं. ४१५/२०२५ भा. न्या. सं. ३०४(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे हे तपास करीत होते.

**पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी प्रसार माध्यमांना दिलेली माहिती खरी ठरली**

या चोरीच्या तपासा संदर्भात प्रसिद्धी माध्यमांना माहिती देताना केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी शहरात मुख्य चौकात बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज आधारे पोलिस तपास करीत आहेत. असे म्हटले होते आणि लवकरच हे आरोपी ताब्यात येतील. अशी आशा व्यक्त केली होती.

**आणखी गुन्ह्याचा तपास लागण्याची शक्यता**

अशा प्रकारच्या चोरीच्या घटनेचा या दोघांचा समावेश आणि सहभाग आहे काय? याचा केज पोलिस तपास करीत असून गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

## स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज येथे तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा संपन्न

**केज । प्रतिनिधी**

स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल, केज येथे तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे सचिव श्री. गदळे सर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती शैलजा इंगळे मॅडम होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून तालुका क्रीडा अधिकारी श्रीमती रेखा यादव मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनोद गुंड सर यांनी केले. प्रमुख अतिथींचे स्वागत विनोद गुंड सर तसेच तांदळे सर व स्वंराजली मॅडम यांनी केले. यावेळी गदळे सर यांनी विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षणाचे महत्त्व तसेच बुद्धिबळ खेळाविषयी मार्गदर्शन केले.




या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेदरम्यान प्रमुख क्रीडा शिक्षक वर्षा मॅडम, गिरी सर, श्री. साजेद पठाण सर, श्री. बोबडे सर, श्री. राऊत सर, कांदे मॅडम, गोसावी सर, नेहरकर सर, पोटभरे सर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचा सत्कार श्री. विनोद गुंड सर यांनी केला.या कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रेमाची भावना जागृत झाली.

## श्री वेद मल्टीस्टेट नायगाव शाखेचा तिसरा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**नायगाव । हानुमंत चंदनकर**

समाजात जन्मलो म्हणजे समाजाचे देणे लागतच या विचारांना केंद्रस्थानी ठेवून कार्यरत असलेल्या श्री वेद मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड, नांदेड शाखा नायगाव चा तिसरा वर्धापन दिन दिमाखात पार पडला. आई तुळजाभवानी मातेच्या पूजनाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. रवींद्र पाटील चव्हाण यांचे प्रतिनिधी केशवराव पाटील चव्हाण होते. व्यासपीठावर उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण, नांदेड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती संजय बेळगे, राष्ट्रवादीचे वसंत सुगावे पाटील,सोसायटीचे चेअरमन मारोतराव कंठेवाड,सुरेश पाटील कल्याण, भगवानराव पाटील लंगडापुरे,नगराध्यक्ष प्रतिनिधी संजय पाटील चव्हाण, माणिक पाटील चव्हाण,ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत सोनखेडकर, शाखा व्यवस्थापक मारोती तेलंग आदी मान्यवर उपस्थित होते. सोसायटीचे संचालक श्री. नागनाथ अनंतवाड यांनी प्रस्ताविक भाषणात सभासद व ठेवीदारांच्या विश्वासामुळे अल्पावधीत मिळवलेल्या यशाची माहिती दिली.नायगाव शाखेला नायगावकरांचे प्रचंड प्रेम मिळाले. सुरुवातीला एवढा चांगला प्रतिसाद मिळेल असं वाटलं नव्हतं. पण आज आमच्या शाखेची सभासद संख्या ५,६४७ आहे. भागभांडवल १६ कोटी ५० लाख, ठेवी ४५ कोटी ५० लाखांवर पोहोचल्या आहेत. शेतकरी, लघु उद्योजक, दुकानदार, गाडिवाले यांच्यापर्यंत बँकेने कर्ज पोहोचवले आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाला मदतीचा हात देण्याची संधी आम्हाला मिळते, हेच आमचं भाग्य आहे. त्यांनी पुढे सांगितले की, या सर्व प्रगतीमागे चेअरमन मारोतराव कंठेवाड साहेबांची दूरदृष्टी आणि सभासद-ठेवीदारांचे अखंड सहकार्य आहे. मान्यवरांनी आपल्या भाषणातून श्री वेद मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या कामकाजाचे कौतुक करताना सांगितले की, सभासद आणि ठेवीदारांचा विश्वासच संस्थेचे सर्वात मोठे भांडवल आहे. या विश्वासाच्या जोरावरच नायगाव शाखा यशस्वी वाटचाल करत आहे.कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन माऊली सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेच्या एम.डी. सौ. सविता कंठेवाड यांनी मानले.

### २८ सप्टेंबर २०१५ माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करा

## सर्व प्रशासकीय कार्यालयांना ईमल, निवेदन स्मरणपत्रकाद्धरे आठवण-खंडूअण्णा गव्हाणे

**पुणे । प्रतिनिधी**

सर्व शासकीय निमशासकीय आधिनिस्त कार्यालयात २८ सप्टेंबर २०२५ माहिती अधिकार दिन साजरा करण्याचे परीत्रक आणि सूचना केली जावी बाबत मा राज्यपाल, मुख्यमंत्री विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडे यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण संस्था पुणे यांनी निवेदनपत्र ईमेलद्वारे स्मरणपत्रकानुसार कळवले आहे. महाराष्ट्र राज्यातील माहिती अधिकार अधिनियम २००५ ची जनजागृती प्रचार-प्रसार व्हावा हर घर माहिती अधिकार पोहोचला जावा यासाठीच यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण संस्था पुणे ची कायदेशीर मान्यता नोंदणी केली आहे या संस्थेच्या माध्यमातून नागरिकांना माहिती अधिकार इ कायदे प्रशिक्षण देऊन प्रचार प्रसार केला जातो आजच्या काळात कायद्याला खूप महत्त्व आहे तो जिवंत राहिला पाहिजे



त्याची कोणतेही मोडतोड बदल होऊ नयेत यासाठी यशोदा संस्था नेहमी प्रयत्न करत आहेत वेळोवेळी जेष्ट समाजसेवक पद्मविभूषण मा. आण्णासाहेब हजारे यांचे आशीर्वाद मार्गदर्शन घेत असते. आज सर्वत्र संस्थां समुह कार्यकर्तेचा सुळसुळाट झाला असुन प्रामाणिक पनांचा अभाव आहे बरेच कार्यकर्ते माहिती अधिकारी कायद्याचं उपजिविकेचे साधन बनवतात दुरुपयोग करतात आर्थिक हे लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने २८ सप्टेंबर २५ हा दिवस महाराष्ट्र शासन अधिनस्त प्रत्येक सरकारी कार्यालयात माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करावा. सदर शासन निर्णयाद्वारे माहिती अधिकार दिवस जिल्ह्यातील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात आयोजित करण्याचीही प्रस्तुत शासन निर्णयामध्ये दिलेल्या सूचना प्रमाणे पुणे जिल्ह्यातील व ई सर्व सरकारी कार्यालयांनी माहिती अधिकार दिवस साजरा करावेत. या वर्षी २८ सप्टेंबर २०२५ या दिवशी शासकीय निर्णया प्रमाणे तशा सूचना आपल्या अधिनस्त सर्व शासकीय कार्यालयाला तात्काळ तातडीने कराव्यात असे ईमेल निवेदन स्मरणपत्र सर्व प्रशासनास यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्षः श्री खंडूअण्णा भरत गव्हाणे, संस्थेचे मार्गदर्शक डॉ. वामन साळवे, अध्यक्षः राहुल वाळंज, जिल्हाध्यक्षः लक्ष्मण गायकवाड खजिनदारः चिंतामण ढमढरे, संह नियोजकः अक्षय शिळीमकर, प्रचार प्रमुखः राकेश दळवी कायदे तज्ञः सरोज नागरगोजे, उपाध्यक्षः विद्याताई गव्हाणे, जिल्हाध्यक्षः राजश्री शिर्के, जिल्हाउपाध्यक्षः सतीश चव्हाण, शिरूर तालुका अध्यक्षः संतोष गव्हाणे, मुळशी तालुका अध्यक्षः रामचंद्र इंगवले संस्था सचिव: आदित्य गव्हाणे इतर संस्था कार्यकारिणी सदस्य सभासद यांच्या वतीने सक्षम शासन प्रशासनास कळविले आहे.

## निलज येथे नवयुग तरुण मंडळातर्फे बाल गणरायाला शांततेत निरोप



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील निलज गावातील नुकतेच स्थापन झालेले नवयुग तरुण मंडळ यांनी गणरायाला पारंपरिक पद्धतीने निरोप दिला. मंडळाचे मार्गदर्शक रामदास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षपदी जनार्धन गायकवाड, तर उपाध्यक्षपदी आदित्य गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली होती.गेल्या दहा दिवसांपासून मंडळाच्या सदस्यांनी उत्साहात गणरायाची सेवा केली. विसर्जन मिरवणूक हायकोर्टाच्या नियमांचे पालन करून डॉल्बी, बेंजो, फटाके वा गुलालाशिवाय साध्या हलगी आणि पारंपरिक वाद्यांच्या तालावर काढण्यात आली. मिरवणुकीनंतर मंडळाकडून गोड असा महाप्रसाद वाटप करण्यात आला.या प्रसंगी भागवत गायकवाड, नवनाथ गायकवाड, भाऊसाहेब गायकवाड, हरिभाऊ गायकवाड, करण गायकवाड, सोमनाथ गायकवाड, मुंग्या भोसले यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077